शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अत्युत्कृष्ट कामाकरिता आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही-१०८९/२८२९/प्रकरण क्रमांक ४०६/आठ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ४ एप्रिल १९९०

संदर्भ :- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०६९-डी दिनांक २६ जून १९७०

२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही १०८०/१३३३/प्रकरण क्रमांक ११८/आठ, दिनांक २४ सप्टेंबर १९८०

३] शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८३/प्रकरण क्रमांक १६-आठ, दिनांक ६ सप्टेंबर, १९८३

परिपत्रक :- शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे पाच वर्षाचे गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ठ असल्यास दोन आगाऊ वेतनवाढी व तीन वर्षांचे गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ठ असल्यास एक आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्यात यावी असे आदेश आहेत. परंतु आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याचा विचार करताना अशा एकूण किती वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घेणे आवश्यक आहे याबाबत निश्चित स्वरूपाचे आदेश नाहीत. अशा कार्यवाहीकरिता निश्चित स्वरूपाचे आदेश असावेत व कार्यपध्दतीत सुसूत्रता यावी म्हणून शासन असे आदेश देत आहे की, आगाऊ वेतनवाढी/वेतनवाढ मंजूर करण्याबाबतच्या शिफारशी सादर करण्यापूर्वी ज्या वर्षी वेतनवाढ मंजूर करावयाची आहे त्याआधीचे लगत पांच वर्षांचे गोपनीय अहवाल [उदाहरणार्थ १ ऑक्टोबर १९८९ पासून आगाऊ वेतनवाढ/वेतन वाढी मंजूर करावयाच्या असल्यास १९८४-८५, ८५-८६, ८६-८७, ८७-८८ आणि ८८-८९ मार्च पर्यंतचे] विचारात घेण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

भा. म. भगत,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी
15 JUN 1990
शाखा -
नि. प्र. उ. जिल्हाधिकारी

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,

[कृ. मा. प. ]

शामुमु. रोटा/साप्रवि/एच-१४१[४०००-५-९०]